# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### पोलीस मोटर परिवहन विभागात बनावट सुटया भागांची खरेदी व देखभाल-दुरुस्तीआड होणा-या गैरव्यवहाराबाबत

**(१) १२९३६ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९८ ते २००६ या कालावधीत पोलीस मोटर परिवहन विभागात बनावट सुटया भागांची खरेदी व देखभाल-दुरूस्तीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कार्यवाही करुन अहवाल उच्च न्यायालयात सादर केला असता न्यायालयाने सदर अहवाल आपल्या आदेशासह मा.गृहमंत्री व सचिवांना दिनांक ३० एप्रिल, २०१० रोजी वा त्यासुमारास पाठविला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारात सहभागी अधिका-यांना पोलीस पदक, पदोन्नती, वेतनवाढ शासनाकडून देण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायालयाच्या आदेशानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे,

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी क्रिमीनल रिट पिटीशन ५०२/२००४ मध्ये दिनांक ३०.०४.२०१० रोजीच्या आदेशात सदर आदेश मा.मंत्री (गृह) व अ.मु.स. (गृह) यांच्या निदर्शनास आणणेबाबत आदेशित केले होते.

(२) सदर प्रकरणात सहभागी असलेल्या ४ अधिकारी/कर्मचाऱ्यांपैकी २ कर्मचारी हे अनुक्रमे सन २००६ व २००९ मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत. संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना पोलीस पदक देण्यात आलेले नाही. तथापि पोलीस शिपाई (लेखनिक) यांस सन १९८५ मध्ये आगाऊ वेतनवाढ देण्यात आलेली आहे. तसेच कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना नियमित वार्षिक वेतनवाढ देण्यात येत आहेत आणि पदोन्नतीही देण्यात आलेल्या आहेत.

(३) मोटार परिवहन विभागात बोगस सुट्ट्या भागांची खरेदी व देखभाल दुरूस्तीमध्ये झालेल्या घोटाळयासंबंधी शासन स्तरावरून दिलेल्या निर्देशानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली होती. सदर चौकशीत भ्रष्टाचार व अनियमितता झाल्याचे निष्पण्ण झाल्याने चतुश्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. ३६४/२००८ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा कलम १३(१)(ड) कलम १३(२) सह भादवि कलम ४६६, ४७७ (अ) अन्वये दि.८.८.२००८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्ह्यात दि.०७/०९/२००९ रोजी मा.विशेष न्यायालय (अँटी करप्शन), पुणे येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात मा. न्यायालयाने दि. २०.०२.२०१७ रोजी आदेश पारित केले असून यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना दोषमुक्त केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत घडणारा प्रत्येक गुन्हाच्या नोंदी क्राईम रिपोर्ट ऑनलाईन पध्दतीने करण्यास सुरुवात केल्याबाबत

**(२) १४९४७ (०७-०४-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत घडणारा प्रत्येक गुन्हा, त्याची तपास प्रक्रिया, कोर्टात त्या प्रकरणी होणारी सुनावणी या सर्व नोंदी, क्राईम रिपोर्ट आता ऑनलाईन पध्दतीने करण्यास सुरुवात झाली असल्याचे दि. २२ जानेवारी,२०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, राज्यातील सर्व पोलीस ठाण्यात डेली क्राईम रिपोर्ट ऑनलाईन करण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालय परिसरातील परिमंडळ १ ते ५ मधील सर्व पोलीस स्टेशनचे हद्दीत घडणारा प्रत्येक गुन्हा सतर्क व सी.सी.टी.एन.एस. मध्ये ऑनलाईन पध्दतीने भरला जातो. परंतु स्थानिक कोर्टात होणारी सुनावणी ऑनलाईन पध्दतीने अद्याप चालु नाही.
(२) शासनाने राज्यातील सर्व पोलीस ठाण्यात सी.सी.टी.एन.एस. प्रकल्प उपलब्ध करुन दिला असून, त्याव्दारे डेली क्राईम रिपोर्ट मध्ये आता ऑनलाईन माहिती प्राप्त होऊ शकते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ.नरेंद्र दाभोळकर, कॉ.गोविंद पानसरे आणि डॉ.कलबुर्गी यांच्या हत्येच्या तपासाबाबत

**(३) २९८५९ (२१-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हसन**

**मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे माजी अध्यख डॉ.नरेंद्र दाभोळकर, कॉ.गोविंद पानसरे आणि डॉ.कलबुर्गी या पुरोगामी विचारवंताच्या मारेकरुचा शोध लावण्यासाठी आता पर्यंत शासनाच्या तपास यंत्राणेमार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती देण्याचे आदेश या प्रकरणी सुनावणी दरम्यान मा.मुंबई उच्च न्यायालयातर्फे शासनास माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर हत्यांच्या प्रकरणात तपास यंत्रणेला अपयश येत असल्याने दोन स्वतंत्र यंत्रणेऐवजी एकाच यंत्रणेमार्फत तपास करण्याची सुचना मा.उच्च न्यायालयाने शासन व सीबीआयला केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या मारेकऱ्यांचा छडा लावण्यात तपास यंत्रणांना येत असलेले अपयश कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने गंभीर बाब समजली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी आजतागायत शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा प्रस्तावित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१७) :**(१) डॉ.नरेंद्र दाभोळकर यांचे हत्येसंदर्भात डेक्कन पो.स्टे. येथे गु.र.क्र.१५४/२०१३,भांदविस कलम ३०२, ३४ शस्त्र कायदा कलम ३ (२५) प्रमाणे दि.२०.०८.२०१३ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास सीबीआयकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट पिटीशन क्रमांक - १५६५/२०१५ च्या अनुषंगाने कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासाबाबतची माहिती मा. न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई यांना सादर करण्याबाबत आदेश दिले आहेत. सदरहू आदेशाच्या अनुषंगाने मा. न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेळो-वेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे तपासाचे प्रगती अहवाल मा. न्यायालयामध्ये सादर केले आहेत. कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या अनुषंगाने २ आरोपींना अटक केली असून २ फरार आरोपींचा शोध सुरु आहे. नमूद २ अटक आरोपींविरुद्ध मा. न्यायालयामध्ये दोषारोपत्र पत्र सादर करण्यात आले आहे. तसेच सदर गुन्हयाचा अधिक तपास अद्याप सुरु आहे.

(२) हे खरे नाही, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदरहू गुन्ह्यांचा तपास एकाच यंत्रणेमार्फत करण्याबाबत कोणत्याही प्रकारच्या सुचना अगर आदेश प्राप्त झालेला नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयात महा ई-सेवेसाठी उद्दिष्टा पेक्षा जास्त केंद्रे वाटप केल्याबाबत**

**(४) ३३०४६ (२३-०२-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात महा ई- सेवेसाठी ३५९ केंद्राचे उद्दिष्ट असताना ३७७ ठिकाणी केंद्र वाटप करण्यांत आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्दिष्टापेक्षा जास्त केंद्रे वाटप करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे. अहमदनगर जिल्हयात ३८८ महा ई-सेवा केंद्रे सुरू करण्यासाठी भारतीय समृध्दी फायनान्स लि.कंपनीने परवानगी दिली असून सध्या अहमदनगर जिल्हयात ३४९ केंद्रे कार्यरत आहेत.

(२) (३) (४) जिल्हाधिकारी, अहमदनगरकडून प्राप्त अहवालानुसार वाटप करण्यात आलेल्या केंद्रांपैकी सर्व केंद्रे एकाच वेळी सुरू राहत नसून विविध कारणांमुळे केंद्र चालकांद्वारे केंद्र बंद करण्यात येतात. त्यामुळे नागरीकांची गैरसोय होऊ नये म्हणून बंद झालेल्या केंद्रांची संख्या विचारात घेऊन, वेळोवेळी, परिस्थितीनुरूप आवश्यक केंद्रे सुरू करण्यास मान्यता देण्यात येते. वरील प्रक्रीया नियमानूसार असल्याने जबाबदारी निश्चित करण्याचा अथवा कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सुमारे १३ हजार पोलिसांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(५) ४१७३५ (२०-०५-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे १३ हजार पोलिसांची पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-११-२०१७) :** (१) होय.

(२) सदरची पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयात रस्त्यांच्या दुरुस्तीसह येथील वाहन चालकांमध्ये जनजागृती करण्याबाबत**

**(६) ४२२४० (१५-०५-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात खडड्ेमय रस्त्यासह, बेजबाबदारपणे वाहन चालविणे, मद्यपान करुन वाहन चालविणे, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी अथवा मालवाहतूक करणे इ. कारणाने सन २०१५ मध्ये २५० जणांचा मृत्यू, ९९ जायबंदी तर ५८२ जण जखमी झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील रस्त्यांच्या दुरुस्तीसह येथील वाहन चालकांमध्ये जनजागृती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०१७) :**(१) बुलढाणा जिल्हयात बेजबाबदारपणे वाहन चालविणे, मद्यपान करुन वाहन चालविणे, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी अथवा मालवाहतूक करणे इ. कारणाने सन २०१५ मध्ये २७८ जणांचा मृत्यु झाला असून ६५९ जण जखमी झाले आहेत.
(२) चिखली देऊळगांव राजा रस्त्याची दुरुस्ती करण्यांत आली असून चिखली ते खामगांव पर्यंत राज्य महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम सुरु आहे. तसेच बुलढाणा शहरात सिग्नलची व्यवस्था आणि आवश्यकतेप्रमाणे दिशादर्शक फलक व गतिरोधक बसविण्यांत आलेले आहेत.

प्रादेशिक परिवहन विभाग तसेच पोलीस विभागाकडून अपघातस्थळाला भेट देऊन सदर ठिकाण हे अपघातप्रवण क्षेत्र म्हणून घोषीत करण्यांत आले आहे. सदर ठिकाणी दिशादर्शक फलक, स्टॉपलाईन, पांढरे पटटे, अरुंद पुल, पुलाचे साईडचे कटटे लावण्याबाबत उपाययोजना करण्यांत आली आहे. वाहनचालकांमध्ये जनजागृती होण्याबाबत चालक चौकसभा, स्कुल बसचालकांचे प्रशिक्षण घेऊन त्यांची अपघातावर आळा बसण्यासाठी जनजागृती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) परिसरात मोठ्या प्रमाणावर डान्स बार सुरु असल्याबाबत.**

**(७) ५४५४१ (२५-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गोळवली, (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील तनिष्का डान्स बारवर छापा टाकून पोलिसांनी बारबाला, बार चालक, वेटर अशा एकूण ११ जणांना ताब्यात घेतल्याचे दिनांक ५ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण शिळफाटा परीसरापासून ते पत्रीपूल पर्यंत मोठ्या प्रमाणावर बार राजरोसपणे चालू असल्याचे निदर्शनास आले असून या बारवर नियंत्रण ठेवण्यात पोलिसांना अपयश येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर डान्सबारवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१२-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कल्याण परिरातील मयुर बार, रिदम बार, समुद्र बार, सेवन स्टार, रिंगटोन बार ॲण्ड रेस्टॉरंट, मस्ती बार व रॉकस्टार या बारबर कारवाई करुन एकूण १४० आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर भारतीय दंड विधान कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सध्या सर्व प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**भायखळा येथील महिला कारागृहातील महिला कैद्याची कंपाऊंडरने छेडछाड केल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत**

**(८) ५४७२६ (२३-०८-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा येथील महिला कारागृहातील महिला कैद्याची दिनांक ३ मार्च, २०१६ वा त्यासुमारास रोजी कंपाऊंडर यशवंत भालेराव यांनी छेडछाड केल्याबद्दल महिला कैद्याच्या तक्रारीनुसार सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशीनुसार दोषी आढळून आलेल्या कंपाऊंडरवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच महिला कारागृहात महिलांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१७)** :(१) होय, सदर प्रकरणाची चौकशी पुर्ण झाली आहे.

(२) सदर प्रकरणी तक्रारदार महिलेने श्री. भालेराव, मिश्रक यांचे विरोधात पोलीस स्टेशन मध्ये केलेली तक्रार मागे घेतली आहे. अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांचेकडील अहवालानुसार श्री. भालेराव, मिश्रक यांचे विरोधात प्रथमदर्शनही कोणतेही पुरावे आढळून आलेले नाही. तथापि ज्या ठिकाणी महिला बंदींचा वावर आहे त्या ठिकाणी अटकाव करण्याची शिफारस केल्याने त्यांना मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे प्रतिनियुक्ती करण्यात आली आहे.

(३) भायखळा जिल्हा कारागृह व मुंबई महिला कारागृह हे एकाच परिसरात असले तरी संपूर्णपणे वेगवेगळे कारागृह आहेत. महिला कारागृहात फक्त महिला अधिकारी व कर्मचारी कार्यरत असतात. दिवसा व रात्री कोणत्याही पुरूष अधिकाऱ्यांना प्रवेश दिला जात नाही. तसेच कारागृह नियमावली १९७९ मधील नियमानुसार अधिकारी व कर्मचारी यांची आवक जावक होत असते. तसेच महिला बंदी उपहारगृह, दवाखाना तसेच मुलाखतीकरिता महिला विभागाचे बाहेर आणावयाचे असल्याच त्यांना महिला कर्मचारी किंवा महिला वार्डर यांचेसोबत पाठविण्यात येते. तसेच कमीत कमी महिला बंदी या महिला विभागाबाहेर येतील याबाबत दक्षता घेतली जाते आणि त्यावर योग्य ते नियंत्रण ठेवण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात ऑर्थर रोड तुरुंगातील कैद्याला अनुमती न घेता चार महिने उपचारासाठी ठेवण्यात आल्याबाबत**

**(९) ५७४३९ (२३-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर पलिकेच्या घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालातील जेष्ठ डॉक्टरांची अनुमती न घेता ऑर्थर रोड तुरुंगातील कैद्याला या रुग्णालयात चार महिने ठेवण्यात आल्याचे दिनांक ६ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ मुंग्या आल्याचे कारण देत सदरहू आरोपीला उक्त रुग्णालयात दाखल करण्यात आले असून केवळ तुरुंग प्रशासनाच्या ऑर्डरमुळे आरोपीला या रुग्णालात दाखल करण्यात आले, तसेच त्या ऑर्डरवर कोणाचीही सही व शिक्का नसल्याने ती ऑर्डर बनावट असल्याचे निदर्शनास येत असून पालिका प्रशासनाला असल्याचा आरोप होत आहे, हे लक्षात घेऊन शासनाने चौकशी केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) न्या.बंदी शेखर विजयन चंद्रशेखर, हा करारागृहात दाखल झाल्यानंतर त्याचे हाडाचे दुखणे, फिशर, अशक्तपणा, यासारख्या आजारांवर वैद्यकिय उपचार करणेकामी करारागृहाचे वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेल्या वेळोवेळी सल्यानुसार बंदी जे.जे.रूग्णालय, व के.ई.एम रूग्णालय येथे औषधोचारासाठी पाठविण्यात आले होते. बंदी शेखर हा दिनांक २० ऑगस्ट, २०१५ ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत के.ई.एम रूग्णालयात आंतररूग्ण म्हणून ५७ दिवस दाखल होता. दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी सदर बंद्यास के.ई.एम मधून परस्पर जे.जे.रूग्णालय येथे पाठविण्यात आले असता, जे.जे.रूग्णालय मुंबई येथील वैद्यकिय मंडळाने सदर बंदयास हॉस्पीटल मध्ये दाखल करण्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले व बंदयास पुन्हा कारागृहात पाठविण्यात आले. परंतु दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजी करागृह वैद्यकिय अधिकारी यांनी बंद्यास पुन्हा औषधोपचारासाठी जे.जे रूग्णालय येथे पाठविले असता, तेथील निवासी वैद्यकिय अधिकारी यांनी सदर बंदयास राजावाडी हॉस्पीटल घाटकोपर येथे दुसरे मत (सेकंड ओपिनियन) घेण्यासाठी बदंयाचे केस पेपरवर नमुद केल्याने दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी बंदयास कारागृह वैद्यकिय अधिकारी यांनी राजावाडी रूग्णालय येथे पाठविण्यात आले. बंदी चंद्रशेखर हा आंतररूग्ण म्हणून दाखल झाला हे निदर्शनास आल्यानंतर त्वरीत याबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्याकरीता अधीक्षक भायखळा जिल्हा कारागृह यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर चौकशी अहवालानुसार जे.जे रूग्णालयातील निवासी वैद्यकिय अधिकारी यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजीच्या वैद्यकिय केस पेपरवरील शिफारशीवरून कारागृहातील वैदयकीय अधिकारी यांनी नियमबाहयपणे सदर बंदयास दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी महानगरपालिकेतील राजावाडी रूग्णालयात पाठविले होते. वरील वैद्यकीय मजकुर

व स्वाक्षरी ही सर जे.जे.समुह रॅग्णालयातील कोणत्याही वैद्यकिय अधिकारी यांची नसुन तसे त्यांनी लेखी कळविले आहे. सदर बंदयाचे संदर्भात कोणतेही कागदपत्र कारागृहास उपलब्ध नरसतांना कारागृहाचे मुख्य वैद्यकिय अधिकारी यांनी त्यांचे नोंदवही क्र.३२ मध्ये नोंद घेवुन राजावाडी रूग्णालयात पाठविण्याबाबतची नोंद केली आहे.

न्या. बंदी. शेखर हा त्याचे आजाराबाबत कारागृह प्रशासनाची दिशाभुल करीत असल्याचे निदर्शनास येऊन देखील कारागृह अधिक्षक व वैद्यकिय अधिकारी यांनी वेळीच योग्य ती दक्षता घेतली नाही, तसेच कागदपत्राची खात्री केलेली नाही. डॉ.अमोल दवणे, तत्कालीन मुख्य वैदयकीय अधिकारी, व डॉ.वाय एम कोकडवार, वैदयकीय अधिकारी, मुंबई मध्यवर्ती कारागृह हे दोषी आढळून आले आहेत. या सर्वांबाबत तसेच श्री.बी.एम.भोसले, अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांचेविरूध्द शिस्तभंगाविषयक कार्यवाही शासन स्तरावरून सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रॉयल व्टिंकल स्टार क्लब या गुंतवणुक कपंनीवर बंदी घातलेली असतांना देखील नाशिक येथे सदर कंपनीचे कार्यालय सुरु असल्याबाबत**

**(१०) ५८७८५ (२६-०८-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम)** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रॉयल व्टिंकल स्टार क्लब या गुंतवणुक कंपनीवर सन २०१२ पासून सेबीच्या आदेशानुसार बंदी घातलेली असतांना देखील नाशिक येथे या कंपनीचे कार्यालय सुरु असून राज्यात अशा अनेक फसव्या गुंतवणुक योजना आणुन गुंतवणुकदारांना फसविण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, अशा फसव्या गुणतवणुक योजनांमुळे उदध्वस्त होणारे संसार, पोलीस तपासात येणा-या अडचणी, कायदयाच्या कचाटयात न येणारे गुन्हेगार या सर्व बाबींचा विचार करता अशा गुंतवणूक योजना असणा-या कंपन्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१७) :**(१) व (२) मा.सॅट कोर्ट, मुंबई यांच्या दि. ३ फेब्रुवारी, २०१६ च्या आदेशानुसार रॉयल व्टिंकल स्टार क्लब कंपनीने गुंतवणूकदारांकडून रक्कम स्वीकारणे बंद केले आहे. तसेच, मा. न्यायालयाने कंपनीस गुंतवणूकदारांचीरक्कम परत करण्यासाठी माहे फेब्रुवारी, २०१८ पर्यंत मुदत दिलीआहे. तथापि, केवळ ठेवसंदर्भातील कागदपत्रे स्वीकारण्याच्या कामासाठी नाशिक येथील सदर कंपनीचे कार्यालय सुरु असून त्याठिकाणी योजनेंतर्गत रक्कत स्वीकारली जात नाही.

सदर फसव्या गुंतवणुक योजना राबवणाऱ्या कंपन्यांच्या बाबतीत वेळोवेळी माहिति पत्रके काढून लोकांना अशा कंपन्यांपासून दुर राहण्याबाबत जागृत करण्यात येत आहे. अशा फसव्या कंपन्यांविरुध्द तक्रारी प्राप्त होताच गुन्हे दाखल करुन एम.पी.आय.डी. कायदा १९९९ अन्वये कारवाई करण्यात येते. तसेच, गुंतवणूकदारांची फसवणूक करण्याच्या इराद्याने काम करणाऱ्या

वित्तीय संस्थांविरुध्द तक्रारीची प्रतिक्षा न करता अथवा योजना बंद होण्याची वाट न पाहता अशा वित्तीय संस्थेविरुध्द देखील उक्त कायद्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना शासन परिपत्रक दि. २९/०९/२०१७ अन्वये देण्यात आल्या आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

---

**वसई (जि.पालघर) येथील मुंबई-अहमदाबाद मार्गावरील बाफाणे चौकीच्याजवळ आदिवासी तरुणाचा अपघाती मृत्यू झाल्याबाबत**

**(११) ६४०७२ (२३-०८-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील मुंबई - अहमदाबाद महामार्गावरील वालीव पोलीस स्टेशन हद्दीतील बाफाणे चौकीच्या जवळील श्री. बुध्या रामा दिवा या आदिवासी तरुणाचा दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी अपघाती मृत्यू झाल्याबाबत श्रमजीवी संघटनेने पोलीस अधिक्षिका (पालघर) यांना दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी लेखी निवेदने तसेच दिनांक १३ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास समर्थने देवून मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सविस्तर तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनाच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच अपघाती मृत्यू पावलेल्या कुटूंबाच्या वारसांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०१७) :**(१) हे खरे आहे.

दिनांक ०१.०४.२०१६ रोजी ००.३० वा. चे सुमारास मुंबई अहमदाबाद महामार्गावरील बाफाना गांवाचे हददीत अज्ञात वाहनाने धडक दिल्याने श्री.बुध्या रामा दिवा या आदिवासी व्यक्तीचा अपघाती मृत्यु झाल्याचे आढळून आले आहे.

(२) या प्रकरणी वालीव पोलीस ठाणे येथे दिनांक ०३.०४.२०१६ रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक १५८/२०१६, भा.दं.वि. कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४ व १८७ अन्वये गुन्हा दाखल करण्यांत आला आहे. गुन्हयातील अज्ञात मोटार वाहनाचा व वाहन चालकाचा तपास चालू आहे. गुन्हा उघडकीस येईपर्यंत तपासावर राहणेकरीता दिनांक २९.०७.२०१६ रोजी अ-फायनल, मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वसई यांचे न्यायालयात पाठविण्यांत आला आहे.

मयताच्या वारसाला आर्थिक मदत मिळण्याकरीता मोटार अपघात इन्शुरन्ससाठी दावा दाखल करण्यांत आलेला आहे. सदरचा दावा मा.न्यायालयात प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माझगांव (मुंबई) येथील शासनाच्या मालकीचा भूखंड कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट यांनी परस्पर विकल्याबाबत**

**(१२) ६५८२४ (१७-०१-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगांव (मुंबई) येथील शासनाच्या मालकीचा २ एकर भूखंड शासनाने 'वुमेन मिशनरी' सोसायटीला सन १९१७ मध्ये भाडेपट्ट्यावर दिलेला असतांना सोसायटीने सन २००५ मध्ये सदर भूखंड हा परस्पर 'कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट' तसेच विकासक 'गोल्ड प्लाझा' यांनी शासनाची परवानगी न घेता विकल्याची तक्रार जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी पोलीसात दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांनी तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई यांचे कार्यालयातील कर्मचारी फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माझगाव महसुल विभागातील भुकर क्र. १२६ मधील मालकीची १३९९ चौ. मी. क्षेत्राची कच्छी लोहाना निवास ट्रस्ट यांनी मे. गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांना संगनमत करुन बनावट कागदपत्र तयार करुन बेकायदेशीररित्या विक्री केली म्हणून भायखळा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २३२/२०१६ भा.दं.वि., कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयात एकूण ८ आरोपी असून त्यापैकी ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. प्रकरण तपासाधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) येथील निवासी भागात रासायनिक कंपनीतील घातक सांडपाणी सोडले जात असल्याबाबत**

**(१३) ६८०२५ (१६-१२-२०१६). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील निवासी भागात रात्री उशिरानंतर रासायनिक कंपनीतील घातक सांडपाणी सोडले जात असल्याने सदर प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश कल्याण - डोंबिवली पालिकेने संबंधितांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई केली असता त्यांना प्रशासनाकडून अभय मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१५-१२-२०१७) :**(१) हे खरे नाही.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने स्थानिक वृत्तपत्रात वायू प्रदूषणाबाबत प्रसिध्द बातमीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वायु प्रदूषणाबाबत काय उपाययोजना करतात याबाबतची विचारणा करण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) होय केली आहे

मे. हिंदूस्तान मोनोमर,फेज २, एमआयडीसी, डोंबिवली या कारखान्याला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक १६ सप्टेंबर,२०१६ रोजी बंदचे आदेश पारीत केले होते. तद्नंतर सदर कंपनीने दिनांक १८ सप्टेंबर,२०१६ रोजी पाईपलाईन मध्ये अडकलेला कच्चा माल पूर्ववत साठवण टाकीमध्ये परत घेताना सदर पाईपलाईन मधून वायू गळती झाल्याने १६ कामगारांना वायू बाधा झाल्याचे निदर्शनास आले होते. सदर कामगारांना दिनांक १८ सप्टेंबर,२०१६ रोजी व तद्नंतर उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. सर्व कामगारांना उपचारानंतर दिनांक २२ सप्टेंबर,२०१६ रोजी अखेर घरी सोडण्यात आले.

दिनांक ०३ ऑक्टोबर,२०१६ रोजी मे. ओयासिस केमिकल इंडस्ट्रिज, प्लॉट नं. डब्ल्यू ५७, एमआयडीसी, फेज २ मधील उदयोगात रासायनिक आम्ल हाताळणी करताना काही प्रमाणात (अंदाजे १० लि.) सांडले गेले व ते पावसाच्या पाण्यात मिसळल्याने धुर निर्माण झाला. तसेच या दरम्यान बॉयलर मधील अतिरिक्त वाफ सुध्दा बाहेर सोडण्यात आली होती. याबाबत तात्काळ उपाययोजना करण्यात येवून सदरचा धुर तात्काळ बंद करण्यात आला. तसेच याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगास प्रस्तावित आदेश दिनांक ०४ ऑक्टोबर,२०१६ रोजी पारित केले. तसेच सदर उदयोगाने याबाबत योग्य ती खबरदारी घेण्याचे पत्र दिनांक ०७ ऑक्टोबर,२०१६ रोजी दिले. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वायू प्रदूषणाबाबत तक्रारीच्या अनुषंगाने रात्रीचे गस्ती पथक तयार केले आहे. परंतु मागील दोन महिन्याच्या कालावधीत वायू प्रदूषणाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील भूकंपग्रस्तांना आरक्षण देण्याबाबत

**(१४) ७३८५६ (२०-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील भूकंपग्रस्तांसाठी प्रदान करण्यात आलेले ३ टक्के आरक्षण रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर निर्णय हा पात्र उमेदवार मिळत नसल्याचे कारण देवून घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूकंपग्रस्तांच्या आरक्षणाचा पुनर्विचार करुन त्यांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१७)** :(१), (२) व (३) हे वस्तुस्थितीवर आधारित नाही. भूकंपग्रस्तांसाठी विहित करण्यात आलेले २% आरक्षण सध्याही पूर्वीप्रमाणे उपलब्ध आहे. दिनांक १७.८.२००९ च्या शासन निर्णयानुसार भूकंपग्रस्तांसाठी विहित करण्यात आलेले २% आरक्षण दिनांक ४.११.२०१६ च्या शासन निर्णयान्वये भूकंपग्रस्तांचे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे प्रकल्पग्रस्तांसाठी वापरण्यास अनुमती देण्यात आलेली आहे. भूकंपग्रस्तांसाठी आरक्षित करण्यात आलेली पदे प्रकल्पग्रस्तांसाठी वापरण्यासाठी भूकंपबाधित उमेदवार उपलब्ध झाले नाही असे महसूल व वन विभागाकडून प्रमाणित करणे आवश्यक राहील या अटीच्या अधिन राहून ही अनुमती देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात दोन कैद्यामध्ये झालेल्या हाणामारीबाबत**

**(१५) ७९३९६ (२१-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या दोन कैद्यांमध्ये रेडिओ चॅनल बदलण्याच्या किरकोळ कारणावरुन हाणामारी झाल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कैद्यांची हाणामारी सोडविण्यास गेलेल्या कारागृह सुरक्षा कर्मचा-यांवरही सदर कैद्यांनी हल्ला करुन त्यांनाही जखमी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच भविष्यात असे प्रकार घडू नयेत म्हणून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१२-२०१७)** :(१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी नाशिकरोड पोलीस स्टेशन येथे भादंवि कलम ३५३,३३२,३२३,५०६,३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारागृहात गैरवर्तन केल्याने बंदी समीर नासिर पठाण व बंदी शाकीर नासिर पठाण उर्फ मोठा पठाण यांना सन्मा. न्यायालयाच्या परवानगीने येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे दि. १०.०२.२०१७ रोजी वर्ग करण्यात आले आहे. तसेच न्यायाधीन बंदी प्रणव तुकाराम बोरसे यास दि. १०.०२.२०१७ रोजी औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह येथे वर्ग करण्यात आले आहे.

तसेच अतिसुरक्षा विभागामध्ये कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी दिवसा ५ व रात्री २ कर्मचा-याची नेमणूक केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक रोड येथील मध्यवर्ती कारागृहातील एका कैदी महिलेकडे २७ ग्रॅम गांजा आढळून आल्याबाबत**

**(१६) ७९४०० (२१-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक रोड येथील मध्यवर्ती कारागृहातील कैदी वैशाली माणिकराव घाणे या महिलेकडे २७ ग्रॅम गांजा असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नाशिक रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच भविष्यात असे प्रकार घडू नयेत म्हणून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१२-२०१७) :**(१) होय, सदर महिला बंदीची कोर्ट पेशीवरुन परत येताना पोलीसांच्या ताब्यात असताना सदर गांजा कारागृहात घेऊन येत असतांना कारागृहाच्या प्रवेशद्वारात घेतलेल्या झडतीत गांजा आढळून आला आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी नाशिकरोड पोलीस स्टेशन यांचेकडून पुढील कायदेशीर कार्यवाही/चौकशी करण्यात येत आहे.

कारागृह प्रवेशद्वारावरील कर्मचारी दक्ष असल्याने तसेच कारागृहातील अत्याधुनिक सुरक्षा उपकरणाद्वारे उदा. हॅन्ड मेटल डिटेक्टर, डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर, बॅगेज स्कॅनर मशिनद्वारे तसेच प्रत्यक्ष महिला कर्मचा-यांकडून महिला बंदीची अंग झडती कसून दक्षतेने घेतल्यामुळे सदर गांजा वस्तु कारागृहात गेलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील गंगापूर-औरंगाबाद महामार्गावर टेम्पो व कार यांची धडक होऊन तीन जण जखमी झाल्याबाबत**

**(१७) ७९६११ (२०-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील गंगापूर-औरंगाबाद महामार्गावरील अंजली पेट्रोल पंपाजवळ टेम्पो व कार यांची धडक होऊन तीन जण जखमी झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय तसेच जखमींना कोणत्या स्वरुपाची मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१७)** :(१) हे खरे नाही.

दिनांक ०७.०१.२०१७ रोजी गंगापूर ते औरंगाबाद मार्गावरील अंजली पेट्रोल पंपासमोरुन औरंगाबादकडे जाणारी इंडिका कार रोडचे बाजुला जावून पलटी झाली व त्यामध्ये कारमधील चार प्रवाशी किरकोळ जखमी झाले होते.

(२) अपघाताची एमएलसी नं. ११७७, ११७८, ११७९ व ११८० पोलीस स्टेशनला प्राप्त झाल्यावरुन चौकशी करण्यांत आली. चौकशीमध्ये किरकोळ जखमी झालेल्या व्यक्तींना त्यांची कोणाविरुध्दही तक्रार नसल्याचे सांगीतले.

जखमींना तातडीने सरकारी दवाखाना, गंगापूर येथे उपचारकामी नेण्यासाठी मदत करण्यांत आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरात नरीमन पॉईट ते बोरिवली तसेच ठाण्याच्या खाडी परिसरातील जलवाहतूकीच्या कामांबाबत

**(१८) *८५०५८* (०४-०९-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात नरीमन पॉइंट ते बोरिवली तसेच ठाण्याच्या खाडी परिसरात जलवाहतूक सुरु करण्याच्या प्रस्तावित कामाला गती द्यावी, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात प्रत्येकी एक नविन बंदर सुरु करावे, नागपूर जिल्हयातील तलावांत सी-प्लेन सुविधा निर्माण करावी, तसेच सागरी किनारपट्टीच्या क्षेत्रात येणा-या काळात गुंतवणूकीचा ओघ वाढणार असून या ठिकाणी सध्या सुरु असणा-या व नविन उद्योगांना मेरी टाईम बोर्डाने राज्यातील औद्योगिक गुंतवणूक वाढविण्यासाठी सहकार्य करावे, असे निर्देश माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा. मुख्यमंत्री यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार अद्यापपर्यत मेरी टाईम बोर्डाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१७)** :(१) होय.

(२) व (३) मुंबईच्या पश्चिम किनारपट्टीवर नरीमन पॉईंट ते बोरीवली या दरम्यान प्रवासी जल वाहतूक सुरु करण्यासंदर्भात, सदर प्रकल्पाच्या सुसाध्यतेचा अभ्यास करण्यासाठी मेसर्स क्रिसील ॲडव्हायजरी सर्व्हिसेस या सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्यामार्फत सुसाध्यता अभ्यास प्रगतीत आहे.

ठाणे खाडीपरिसरात जलवाहतूक सुरु करण्याच्या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करण्याची कार्यवाही ठाणे महानगरपालिका यांच्यामार्फत करण्यात येत आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी महाराष्ट्र मेरीटाईत बोर्डामार्फत करण्यात येईल. दरम्यान, ठाणे खाडीमध्ये भाईंदर ते साकेत (ठाणे) दरम्यान प्रवासी जलवाहतूक करण्यासाठी एप्रिल २०१७ मध्ये प्रायोगिक तत्वावर एक वर्षासाठी परवानगी देण्यात आली आहे.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात प्रत्येकी एक नविन बंदर प्रकल्प निर्माण करण्यासाठी मे.होव इंडिया प्रा.लि. या सल्लागार संस्थेमार्फत अभ्यास प्रगतीत आहे. प्राथमिक अभ्यासाअंती, रत्नागिरी जिल्हयात भंडारवाडी (ता.रत्नागिरी) आणि सिंधुदुर्ग जिल्हयात पडवण (ता.देवगड) हया दोन ठिकाणांची निवड करण्यात आली असून, आता बंदर प्रकल्पांचा तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी सर्व्हेक्षणाचे काम प्रगतीत आहे.

विदर्भामध्ये पर्यटनाला चालना देण्यासाठी तेथील जलाशयांमध्ये महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, नागपूर सुधार न्यास, आणि पर्यटन विकास महामंडळ यांच्यामार्फत सी-प्लेन सुविधा निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

किनारपट्टीवर जेट्टी, शिपयार्ड, मालवाहतूक, जलवाहतूक, जलपर्यटन या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करु इच्छिणाऱ्या उद्योजकांना महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत आवश्यक त्या परवानग्या देणे, प्रकल्पासाठी दाखले प्राप्त करणे याकरीता सर्वतोपरी सहकार्य करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खालापूर (जि.रायगड) भागात कारखान्यांना वारंवार आग लागत असल्याबाबत**

**(१९) ८५१६३ (०४-०९-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण-खोपोली महामार्गावरील ऑक्टा गार्मेन्ट कंपनीला दिनांक १४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास आग लागून कंपनी भस्मसात झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आग लागण्याची कारणे काय आहेत व गत तीन वर्षात याच परिसरातील खालापूर भागात ११ कारखाने आग लागून भस्मसात झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कारखान्यांना लागणा-या आगी या विमा कंपनीचे अधिकारी व मालक यांच्यातील असलेल्या आर्थिक संबंधातून होत असल्याचा संशय औद्योगिक पट्ट्यातून काम करणा-या कारखान्यातील कामगारांनी आरोप केला असून याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक पोलीस स्थानकात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-११-२०१७) :**(१) आग लागली हे खरे आहे तथापि घटना घडली तो दिनांक १४ एप्रिल २०१७ नसून दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी पहाटे ३.१५ वाजण्याच्या सुमारास सदर कारखान्याला आग लागल्याची घटना घडली आहे.

(२) सदर आस्थापना बंद झाल्यावर, आस्थापनेतील रात्रीच्यावेळी चालू असलेल्या टयुबलाईटच्या स्विच बोर्डमध्ये स्पार्किंग होऊन त्याच्या ठिणग्या खाली ठेवलेल्या फोमवर पडून आग लागली. जानेवारी २०१४ ते जून २०१७ पर्यन्त खालापूर तालुक्यात एकूण १२ कारखान्यांना आग लागल्याच्या घटना घडल्या आहेत.

(३), (४) व (५) अशाप्रकारची कोणतीही तक्रार स्थानिक पोलीस स्टेशनला दाखल झाली नाही.

तथापि, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, रायगड येथील अधिका-यांनी केलेल्या चौकशीनुसार मे.ऑक्टा गारमेंटमध्ये २० पेक्षा कमी कामगार असल्याने या आस्थापनेस कारखाने अधिनियम,१९४८ च्या तरतूदी लागू होत नाहीत.

सदर घटनेची चौकशी सहाय्यक विद्युत निरिक्षक, निरिक्षण विभाग रायगड, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांनी केलेली आहे. आस्थापनेतील जळालेल्या भागाचे नविन विद्युत संच मांडणी करण्याकरीता व दोष निवारण करण्याकरीता सुधारणा ज्ञापन पत्र क्र.६२४, दिनांक २०/०४/२०१७ नुसार देण्यात आले.

सदर १२ कारखान्यांमध्ये लागलेल्या आगीच्या चौकशीत कारखाने अधिनियमांतर्गत जेथे भंग आढळून आला त्यापैकी चार कारखान्यांच्या भोगवटादार/ व्यवस्थापकाविरुध्द एकूण ६ खटले औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी रायगड यांचे न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत. उर्वरित दोन कारखान्यांच्या भोगवटादार/ व्यवस्थापकानी भंगाची पूर्तता केल्यामुळे त्यांना ताकीद देण्यात आलेली आहे. चार कारखान्यांत लागलेल्या आगीच्या चौकशीत कारखाने अधिनियम,१९४८ चा भंग आढळलेला नाही व एका कारखान्याला कारखाने अधिनियम, १९४८ च्या तरतूदी लागू होत नाहीत आणि एका कारखान्यावर कायदेशीर कारवाई सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे घिवली (ता.जि.पालघर) येथील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम योजनेंतर्गत नविन योजनेच्या कामाबाबत**

**(२०) ८५२३३ (२१-०८-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घिवली (ता.जि.पालघर) येथील गावाला पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत असल्याने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम योजनेंतर्गत सन २०१६-१७ च्या कृती आराखडयात नविन योजनेचा समावेश केला असून रु. ९६.३८ लक्ष किंमतीच्या अंदाज पत्रकास जिल्हा परिषद स्तरावर दिनांक ३ मार्च,२०१७ रोजी वा त्यासुमारास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेचे कामाला अद्यापपर्यंत सुरुवात झालेली आहे काय,

(३) असल्यास, संबंधित कामाची सद्य:स्थिती काय आहे व सदरहू योजना किती कालावधीत पूर्ण करण्यात येईल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-१२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदरहू योजनेच्या कामाचे कार्यादेश दि.२१/८/२०१७ रोजी देण्यात आले असून दि.४/९/२०१७ पासून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे.

(३) सदरहू योजनेतील नविन जलकुंभ बांधण्यासाठी अस्तित्वातील कालबाह्य जलकुंभ पाडण्याचे काम सुरु असून, योजनेच्या कामाची मुदत माहे मार्च २०१९ पर्यंत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील कलिना वैज्ञानिक प्रयोगशाळेस अहवाल देण्यास होत असलेल्या विलंबाबाबत**

**(२१) ८५२८२ (०४-०९-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कलिना वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये ३०,००० हून अधिक नमुने प्रलंबित असल्यामुळे त्याचा परिणाम, रुग्णाचे नातेवाईक व रुग्णालये तसेच पोलीस तपास यांचेवर होत असून ६-६ महिने अहवाल प्राप्त होत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) कलिना फॉरेंसिक लॅबॉरटरी निदेशालय अंतर्गत राज्यात वैज्ञानिक प्रयोगशाळा असून शेकडो पदे रिक्त असल्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत असल्यामुळे अहवाल देण्यास विलंब होत असल्याचे वैज्ञानिक प्रयोगशाळा प्रशासनाकडून सांगण्यात येत असून पदे वाढविण्याबाबचा प्रस्ताव शासनाकडे यापूर्वी सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबात चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुसार अहवाल तात्काळ देण्यासाठी रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१७) :**(१) माहे एप्रिल २०१७ अखेर न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई येथे एकूण ११,१७० प्रकरणे व ८४६४७ नमुने प्रलंबित होती.
(२) (३) व (४) न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयामध्ये सध्या ५६८ पदे रिक्त असली तरी, दि.१०.०२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये नव्याने मंजूर करण्यात आलेली २७५ पदेही त्या रिक्त पदांमध्येच समाविष्ट आहेत. या नव्याने निर्माण करण्यात आलेल्या पदांसह एकूण सर्वच रिक्त पदे भरणे बाबत कार्यवाही सुरू आहे.
याशिवाय, सदर संचालनालयांतर्गत विविध प्रयोगशाळांमधील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी एकूण ६५० पदांवर करार पध्दतीने अधिकारी /कर्मचारी पदे भरण्याची कार्यवाही सुद्धा सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रबाळे, नवी मुंबई येथील मे.संजीवनी पॅरेन्टल या इंजेक्शन बनविणा-या कारखान्यातील पेढीत आढळून आलेल्या त्रुटीबाबत

**(२२) ८५३१७ (२१-०८-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रबाळे, नवी मुंबई येथील मे.संजीवनी पॅरेन्टल या इंजेक्शन बनविणा-या कारखान्यातील पेढीत आढळून आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने पाठविण्यात आलेल्या ४ औषधांच्या नमुन्याचे विश्लेषण प्रयोगशाळेत पुर्ण झाले आहे काय,

(२)असल्यास, याबाबतचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणात येत आहे व कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-१२-२०१७) :**(१) होय.

(२) मे.संजिवनी पॅरेंट्रल लि. या उत्पादकाकडून घेतलेल्या ४ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त असून शासकीय विश्लेषक, औषध नियंत्रण प्रयोगशाळा यांनी सर्व नमुने प्रमाणीत असल्याचे घोषित केले आहेत. सबब, कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील दादर येथील सिव्हीक सेंटर इमारतीतील बांधकाम अनधिकृत असतांनाही पालिकेच्या अभियंत्यांनी भोगवटा प्रमाणपत्र दिल्याबाबत

**(२३) ८५३३० (०४-०९-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर येथील सिव्हीक सेंटर इमारतीत सीएस क्र.४,१/४ व १/५ हे बांधकाम अनधिकृत असतांना सदर इमारतीला पालिकेच्या बांधकाम विभागातील अभियंत्यांनी भोगवटा प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी आग्रीपाडा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने कागदपत्रे पडताळणी व साक्षीदार पडताळणी पोलीसांनी पुर्ण केली आहे काय,

(२) असल्यास, सदर पडताळणीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१७) :**(१) सदर गुन्ह्याचा तपास चालु असून तपासा दरम्यान साक्षीदारांची तपासणी करण्यात येत आहे.

(२) सिव्हिक सेंटर, दादर या इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम झालेले असतांना अशा परिस्थितीत भोगवटा प्रमाणपत्र देणे चुकीचे असतांना देखील सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देवून शासनाची व जनतेची फसवणूक केल्याने आग्रीपाडा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १३१/२०१६ भा.दं.वि. कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४, १६७ अन्वये ६ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधिन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कापसाळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे नव्याने नळपाणीपुरवठा योजना राबविणेबाबत**

**(२४) ८५३६५ (२१-०८-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कापसाळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) हे गाव चिपळूण शहरापासून जवळ असून जलदगतीने विकसीत होत असल्याने उक्त गावास पाणीपुरवठा करण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाचा समावेश निमशहरी भागात करून नव्याने पाणीपुरवठा योजना राबविण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-१२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) निमशहरी (पेरी अर्बन) गावासाठी नवीन पाणी पुरवठा योजना जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येते. तथापि, या योजनेसाठी आवश्यक असलेले निकष विहित मुदतीत पूर्ण झाले नसल्यामुळे जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत सदर गावाच्या नवीन योजनेचा समावेश करता आला नाही. त्यामुळे कापसाळ गावासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम टप्पा-२ अथवा राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत कार्यवाही होणे उचित ठरेल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुहागर, चिपळूण व खेड (जि.रत्नागिरी) येथील गावांना जोडणाऱ्या रस्त्यांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२५) ८५५२६ (०४-०९-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे कोळवली (ता.गुहागर), मौजे चिवेली (ता.चिपळूण), मौजे तुंबाड, मौजे आयनी, मौजे आमशेत आणि मौजे होडखाड (ता.खेड) ही गावे खाडीकिनारी वसलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोळवली बंदरटोक ते जेटी, चिवेली बंदर, तुंबाड कदमवाडी ते बंदर, आयनी रेल्वे स्टेशन ते जेटी, आमशेत मोहल्ला ते जेटी, होडखाड भोईवाडी ते जेटी हे जोडरस्ते नसल्याने या भागातील रहिवाशांचे प्रचंड हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व जोडरस्त्यांसाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डामार्फत निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून दिनांक १९ मे, २०१६ च्या पत्रान्वये तसेच वारंवार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१७)** :(१), (२) व (३) होय.
(४) व (५) होडखाड (ता.खेड), येथे पोचरस्ता तयार करणे हे काम जिल्हा नियोजन समिती रत्नागिरी मार्फत सन २०१६-१७ मध्ये ते पूर्ण करण्यात आले आहे.

तुंबाड बंदर येथे जोडरस्ता तयार करणे (कदमवाडी भोईवाडी शिवळेवाडी) व कोळवली येथील जेट्टीपर्यंत जोडरस्ता तयार करणे ही कामे जिल्हा नियोजन समिती अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये प्रस्तावित करण्यात आली आहेत. प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम त्वरीत सुरु करण्यात येईल.

त्याचप्रमाणे आमशेत मोहल्ला ते जेट्टी पर्यंत जोडरस्ता तयार करणे या कामांची पाहणी करुन आवश्यक असल्यास सदरचे काम जिल्हा नियोजन समितीमार्फत सन २०१८-१९ किंवा या आर्थिक वर्षात निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

## बुलढाणा जिल्हा कामगार कार्यालयातील रिक्त पदांबाबत

**(२६) ८५६४८ (०४-०९-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हा कामगार कार्यालयातील जिल्हा कामगार अधिकारी यांचे सह विविध आठ पदे रिक्त असल्याने विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनांची अंमलबजावणी करण्यात अनेक अडचणी निर्माण होत असल्याची बाब दिनांक १ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार सदरहु रिक्त पदे भरून विभागाच्या योजनांची अमंलबजावणी प्रभावीपणे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-११-२०१७)** :(१) सरकारी कामगार अधिकारी बुलढाणा कार्यालयातील दुकाने निरीक्षक श्रेणी-१ संवर्गातील १, दुकाने निरिक्षक श्रेणी-२ संवर्गातील २ व शिपाई संवर्गातील ३ अशी एकुण ६ पदे रिक्त आहेत, तथापि बाह्ययंत्रणेमार्फत ३ कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आल्याने कामगार विभागामार्फत योजना राबविण्यात अडचणी येत असल्याची बाब खरी नाही.

(२), (३) व (४) गट क मधील पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही कामगार आयुक्त यांचे स्तरावर सुरू आहे.

---

**रायगड जिल्ह्यातील मच्छिमार बांधवांना जमिनी रिकाम्या करण्यासाठी भाग पाडण्यात येत असल्याबाबत**

**(२७) ८५७०० (०४-०९-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील मच्छिमार बांधवांना राहत असलेल्या जमिनी रिकामी करण्यासाठी संबंधित विभागाने पाठविलेल्या नाटीशी तातडीने रद्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.मत्स्यसंवर्धन मंत्री व राज्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्र किनाऱ्यालगतच्या जमिनीवर पिढ्यानपिढ्या उपजिविका करून वास्तव्य करणाऱ्या मच्छिमार बांधवांना त्यांच्या नावावर जमिनी नसल्याच्या कारणास्तव जमिनी रिकामी करण्यास भाग पाडण्यात येत असल्याने त्यांना त्यांच्या कुटूंबियांचा उदरनिर्वाह करणे कठिण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मच्छिमारांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने जमिनी रिकामी करण्याच्या नोटीशी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१७) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या 'जय महाराष्ट्र' लिहलेल्या बसचालक व वाहकांवर कर्नाटक पोलिसांनी कारवाई केल्याबाबत**

**(२८) ८५८५२ (०४-०९-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर),**

**श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोणत्याही निवडणूकीत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक कार्यक्रमात तसेच सभागृहात महाराष्ट्राच्या अस्मितेची ओळख असलेले 'जय महाराष्ट्र' उच्चारल्यास त्यांचे पद रद्द करण्याचा कायदा करणार असल्याचे वक्तव्य कर्नाटक राज्याचे नगरविकास मंत्री यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केल्यामुळे सीमावर्ती मराठी बांधवांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या 'जय महाराष्ट्र' लिहीलेल्या एसटी बसच्या बसचालक व वाहकासह २० प्रवाश्यांवर कर्नाटक पोलिसांनी दिनांक ४ जुन, २०१७ रोजी वा त्या सुमारास गुन्हा दाखल केल्यामुळे महाराष्ट्रात जनतेकडून असंतोष व्यक्त केला जाऊन आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रश्नी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सबंधित बसचालक व वाहकांवरील अन्याय दुर करण्यासंदर्भात तसेच कर्नाटक प्रशासनाची सीमाभागात सुरु असलेली दडपशाही, मराठी भाषेची गळचेपी व मराठी भाषिकांवरील अन्याय दुर करण्यासंदर्भात शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. तथापि या अनुषंगाने कोल्हापूर अथवा परिसरात आंदोलने झालेली नाहीत.

(३) होय.

(४) दिनांक ०२.०६.२०१७ रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मुंबई आगाराची मुंबई - बेळगांव मार्गावर जाणारी बस क्र.एमएच-२०-डीएल-३९५८ ही "जय महाराष्ट्र" असे बोधचिन्ह असलेली पहिली बस सोडण्यात आली होती. सदर मार्गवर रा.प.सातारा आगार येथे चालक / वाहक बदल होऊन रा.प.सातारा आगाराचे चालक श्री.प्रमोद शंकर गायकवाड, बिल्ला क्र.३०२२ व वाहक श्री.देवीदास हरी बोराडे, बिल्ला क्र.५०१५ हे कर्तव्यावर होते. सदर बस २१.३० वा. बेळगांव बसस्थानकावर पोचली असता तेथे उपस्थित असलेले महाराष्ट्र एकीकरण समितीचे कार्यकर्ते व मराठी भाषिक यांनी बसचे जल्लोषात स्वागत करुन "जय महाराष्ट्र" अशी जोरदार घोषणाबाजी केली असता श्री. आर. बी. सौदागर, पोलीस निरीक्षक, बेळगांव मार्केड यार्ड पोलीस स्टेशन यांनी रा. प. बस चालक, वाहकासह महाराष्ट्र एकीकरण समितीचे कार्यकर्ते श्री.मदन भामणे, श्री सुरज कणबरकर, श्री.अमर यल्लुरकर, श्री.गजानन दड्डीकर, श्री.मदन लंगरखाडे यांचेसह अन्य अनोळखी १५ व्यक्तीवर भा.दं.वि. कलम १४३, १४७ व १५३ (ए) आर/डब्ल्यू १४९ या कलमा खाली गुन्हा नोंद केला आहे व गुन्हा नोंद झाल्यानंतर चालक, वाहक यांना दिनांक ०३.०६.२०१७ रोजी रात्री ०१.०० वा अटक न करता सोडून दिले.

राज्य परिवहन चालक व वाहकास सदर गुन्हयांच्या अनुषंगाने न्यायालयीन कामाकाजासंदर्भात आवश्यक ती मदत राज्य परिवहन विभागाकडून करण्यात येत आहे.

कर्नाटक प्रशासनाची सीमाभागात सुरु असलेली दडपशाही, मराठी भाषेची गळचेपी व मराठी भाषिकांवरील अन्याय दुर करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने गंभीर दखल घेतलेली असून मा. श्री.चंद्रकांत दादा पाटील, समन्वयक मंत्री, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न यांनी दिनांक २३/०५/२०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनाची नाराजी कर्नाटक शासनास कळविलेली आहे. तसेच सीमा प्रश्नाच्या अनुषंगाने राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दावा क्र.४/२००४ दाखल केलेला आहे. या न्यायालयीन प्रकरणी राज्य शासनाने नामांकित वकिलांची नेमणूक केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पोलीस दलाकरिता शासनाने खरेदी केलेली ८० बुलेटफ्रुफ जाकिटे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत**

**(२९) ८५९५२ (०४-०९-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस दलाकरता ५००० बुलेटप्रुफ जाकिटे खरेदी करण्याचा निर्णय होऊन ती खरेदी करण्यात आल्याची बाब दिनांक १० मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २६ /११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर सन २०११ साली शासनाने ६ कोटी रुपयांना खरेदी केलेली ८० बुलेटफ्रुफ जाकिटे निकृष्ट दर्जाची आढळल्याने या प्रकरणी लाचलुचपत प्रतीबंधक विभागाने (एसीबीने) केलेल्या चौकशीमध्ये खासगी कंपनी व एका आयपीएस अधिकाऱ्याविरोधात आरोप निश्चित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या चौकशीत ज्या खासगी कंपनी व आयपीएस अधिकाऱ्याविरोधात आरोप निश्चित करण्यात आले होते त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०१७) :**(१) होय. तथापि दि.१९/०८/२०१७ च्या सुधारित पुरवठा आदेशान्वये एकूण ४६१४ बुलेट प्रुफ जॅकेट प्राप्त झालेले आहेत व त्यातील काही नमुणे बॅलस्टिक चाचणी करिता सेंट्रल फॉरेंन्सिक सायन्स लॅब्रोटरी, चंदीगड येथे पाठविण्यात आलेले आहे.

(२) सन २०११ मध्ये केंद्रीय राखीव पोलीस दल, नवी दिल्ली यांचेकडून २००० नग बुलेट प्रुफ जॅकेट खरेदी केलेले आहेत. मात्र ८० बुलेफ्रुफ जॅकेट प्रकरणी लाचलुचपत विभागाने चौकशी कलेली नसून ८२ बॉम्ब सूट खरेदी प्रकरणी लाचलुचपत विभागाने चौकशी कलेली आहे.

(३) बॉम्ब सूट प्रकरणी लाचलुचपत विभागाने चौकशी करून सादर केलेल्या अहवालावरून मे. टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रा.लि. च्या संचालकांविरूद्ध कुलाबा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र २१/२०१२ भा.द.वि. संहिता कलम ४२०, ४०६, ४६९, ४११, ४१८, १२०(ब) गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सध्या या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई अधिक तपास करीत आहे.

सदर गुन्ह्याचा तपास अमेरिका, चीन व दक्षिण आफ्रिका या देशातही होणे आवश्यक असल्याने त्याकरिता लेटर रोगॅटरी (LR) पाठविण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच, सदर कंपनीस बॉम्ब सूटच्या बीलापोटी अदा करण्यात आलेली रक्कम रू.६,२१,६९,१२०/- व्याजासह (१८%) परत मिळणेबाबत मा. उच्च न्यायलय, खंडपीठ, मुंबई येथे कंपनी विरूद्ध दि.१३/०२/२०१६ रोजी सिव्हील सूट क्र.६२/२०१७ दाखल करण्यात आला आहे.

श्री एस.के.तरवडे, भापोसे यांच्यावर ठेवण्यात आलेल्या दोषारोपांची चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी म्हणून प्रधान सचिव तथा विशेष चौकशी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आलेली असून, सदर चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दिघीसह करलास, मणेरी व नानवली (जि.रायगड) या चार गावांना**
**दिघी पोर्ट ट्रस्टने पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(३०) ८६०८६ (२१-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील दिघीसह करलास, मणेरी व नानवली या चार गावांना दिघी पोर्ट ट्रस्टने पाणी पुरवठा करण्याचे मान्य करुनही पाणी पुरवठा न केल्याने न्यायालयाच्या आदेशानुसार रायगड जिल्हाधिका-यांनी दिघी पोर्ट ट्रस्टच बंद केले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चार गावांना दर दिवशी १०० टँकर पाणी पुरवठा करण्याची लेखी हमी तसेच पाण्यासाठी दरमहा ३५ लाखांप्रमाणे २ महिन्याचे ७० लाख रुपये न्यायालयात भरण्यात यावेत असे आदेश दिघी पोर्ट ट्रस्टला देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हाधिकारी यांनी न्यायालयाच्या आदेशानुसार केलेल्या कारवाईनुसार दिघीसह करलास, मणेरी व नानवली या चार गावांना पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे तसेच या संपूर्ण प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-१२-२०१७) :**(१) हे खरे नाही.

दिघी कोळी समाज मुंबई रहिवासी संघ यांनी दाखल केलेल्या क्र.४२/०९ च्या जनहित याचिकेवर मा. मुबई उच्च न्यायालयाने दिघी बंदराचे काम थांबवून सील करण्याचे आदेश दिल्याने दिनांक २८.०४.२०१७ रोजी दिघी पोर्ट ट्रस्टचे कामकाज बंद करण्यात आले. तथापि, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक ०४.०५.२०१७ च्या आदेशानुसार दिनांक ०५.०५.२०१७ रोजी दिघी पोर्ट ट्रस्टचे कामकाज पुन्हा पुर्ववत सुरु करण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार दिघी पोर्ट ट्रस्ट यांच्याकडून रु.७०.०० लक्ष इतकी रक्कम रजिस्ट्रार जनरल, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे जमा करण्यात आली आहे.

(३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार दिघी पोर्ट ट्रस्ट यांच्याकडून दिघीसह करलास, मणेरी व नानवली या चार गावांना पाणी टंचाई काळात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर परिवहन विभागाने ८७ बसेसची नोंदणी रद्द केल्याबाबत**

**(३१) ८६९२२ (१४-०८-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर महानगरपालिकेने माहे मे,२०१७ मध्ये केंद्र शासनाच्या JNNURM या योजनेमधून १०० बसेस घेतल्या होत्या हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैंकी ८७ बसेसची नोंदणी सोलापूर परिवहन विभागाने (आरटीओ) रद्द केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ८७ बसेस परिवहन विभागाने रद्द करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०१७) :**(१) • केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमासाठी २०० बसेस मंजूर करण्यात आल्या होत्या.
• त्यापैकी १४४ बसेस सोलापूर महानगरपालिकेकडे दाखल झाल्या आहेत.
(२) होय, हे खरे असल्याचे सोलापूर महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) सदर बसेसच्या चेसिस तडा (crack) गेल्याने परिवहन विभागाने नोंदणी रद्द केली आहे.

---

**नाशिक येथे दाऊद इब्राहिमच्या नातेवाईकांच्या लग्नात राज्यातील मंत्री, आमदार व अधिकारी उपस्थित असल्याबाबत**

**(३२) ८७४८६ (०४-०९-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे दाऊद इब्राहिमच्या नातेवाईकांच्या लग्नात दिनांक १९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास राज्यातील मा.मंत्री, आमदार व पोलीसांसह काही अधिकारी उपस्थित झाले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, या लग्नात कोणकोणते मा.मंत्री, आमदार, पोलीस अधिकारी व इतर अधिकारी उपस्थित असल्याचे आढळून आले आहे,
(४) असल्यास, त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०१७) :**(१) व (२) होय,
(३) व (४) दाऊदचे नातेवाईक कोकणी यांच्या मुलीचे लग्न हिसाम उदीत खतीब यांच्या मुलाशी झाले आहे. श्री. खतीब हे नाशिक शहरातील एक प्रतिष्ठित मुस्लीम धर्मगरू असून

शांतता कमिटीचे सदस्य आहेत. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास हिंदू/ मुस्लीम समाजात सामंजस्य घडवून आणण्याची त्यांची भुमिका असते. त्यामुळे त्यांच्या निमंत्रणाला मान देवुन लोक प्रतिनिधी व पोलीस अधिकारी/कर्मचारी या लग्नाला उपस्थित राहिले असे चौकशीअंती निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी कोणाचीही कसूरी दिसून येत नसल्याने कारवाईचा प्रश्न उदभवत नाही.

(५) विलंब झालेला नाही.

---

**कवठेमहांकाळ (जि.सांगली) तालुक्यातील आगळगाव**
**फाटयाजवळ मिनी बसचा झालेला अपघात**

**(३३) ८७६९८ (१४-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवठे-महांकाळ (जि.सांगली) तालुक्यातील मिरज-पंढरपूर मार्गावरील आगळगाव फाटयावर उभ्या असलेल्या वाळूच्या ट्रकला मागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात मिनी बसमधील ८ जण ठार झाल्याची घटना माहे एप्रिल, २०१७ च्या चौथ्या सप्ताहात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) दिनांक २१.०४.२०१७ रोजी पहाटे ०४.३० च्या सुमारास मिरज-पंढरपूर राष्ट्रीय मार्गावरील आगळगांव फाटयाजवळ रोडवर बंद पडलेल्या व कोणतेही रिफलेक्टर/पार्किंग लाईट न लावता धोकादायक परिस्थितीत उभ्या असलेल्या वाळूच्या ट्रकला पंढरपूरकडून मिरजकडे जाणाऱ्या मिनी बसची धडक बसून त्यामध्ये मिनी बसमधील ८ इसम मृत्युमुखी पडले तर १० जण जखमी झाले.

याप्रकरणी कवठेमहांकाळ पोलीस ठाणे येथे दिनांक २२.०४.२०१७ रोजी गु.र.क्र.९७/२०१७, भा.दं.वि.कलम ३०४(२), ३०४(अ), २८३, ३३७, ३३८, ४२७, ४६८, ४७१, ४२०, ३४ मो.वा.का., १९८८ चे कलम १०४/१७७ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यांत आला आहे. अपघातातील टक मालकाने वाहनाच्या मूळ आर.टी.ओ.नोंदणी क्रमांकामध्ये जाणीवपूर्वक खोटी नंबरप्लेट लावल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयामध्ये ४६८, ४७१ व ४२० या कलमांचा अंतर्भाव करण्यांत आला आहे.

अपघातातील निष्पन्न आरोपी ट्रकचालक यास दिनांक २२.०४.२०१७ रोजी अटक करुन दिनांक २४.०४.२०१७ पर्यंत पोलीस कोठडी तर पुढे दिनांक ०६.०६.२०१७ पर्यंत न्यायालयीन कोठडी मंजूर करण्यांत आली होती तर वाहनमालक यास दिनांक २७.०४.२०१७ रोजी अटक

करण्यांत आली असून त्यास मा.न्यायालयाने दिनांक ०६.०६.२०१७ पर्यंत न्यायालयीन कोठडी मंजूर केली होती. दिनांक ०६.०६.२०१७ पासून दोन्ही आरोपी जामीनावर आहेत. पुढील तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पूरातन विभागातून मौल्यवान धातूची नाणी चोरी झाल्याबाबत**

**(३४) ८९८९८ (०४-०९-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय ऐतिहासीक संस्कृती व पूरातन विभागातून मौल्यवान धातूची नाणी चोरीस जावून अद्यापही सदर प्रकरणातील संशयितांवर कारवाई झाली नसल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने गुन्हेगारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-११-२०१७) :**(१), (२) व (३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज , नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्व विभागातील २६३३ पुरातन वस्तु आणि २२४ विष्णुकंडीण नाणी गहाळ झाली आहेत.
स्थावर अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ यांच्या उपरोक्त घटनेबाबतच्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन, अंबाझरी येथे अप.क्रमांक ७२/१७ कलम ३८० भा.दं.वि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमधील उपहारगृहे तसेच इतर व्यवस्थापनामध्ये सर्वाधिक बालकामगार असल्याबाबत**

**(३५) ९०३२८ (०४-०९-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये उपहारगृहे तसेच इतर व्यवस्थापनामध्ये बालकामगार प्रतिबंधक कायदा २०१६ चे उल्लघंन करून राज्यातील सर्वाधिक बालकामगार असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तदनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-११-२०१७)** :(१), (२) व (३) मुंबईमध्ये उपहारगृहे तसेच इतर व्यवस्थापनामध्ये बाल कामगार प्रतिबंधक कायदा २०१६ चे उल्लघंन करुन राज्यातील सर्वाधिक बाल कामगार असल्याचे माहे जुन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे नाही.

तथापि, सदर अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करणेकरीता नियमितपणे घेण्यात येणा-या धाडसत्राअंतर्गत माहे जून-२०१७ मध्ये मुंबईमधील (मुंबई शहर, उपनगर पूर्व, उपनगर पश्चिम) २ धाडीमध्ये, दुकाने व आस्थापना या उद्योगातून २ बाल कामगारांची मुक्तता करण्यात आली असून २ दोषी मालकांविरुध्द FIR दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने सौर कृषीपंप वितरणाचे निकष बदलल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(३६) ९०४७४ (१५-०८-२०१७). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सौर कृषीपंप वितरणाचे निकष बदलल्याने या निर्णयाने सर्वाधिक नुकसान अकोल्यासह आत्महत्याग्रस्त ६ जिल्हयांना बसणार असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत आत्महत्याग्रस्त जिल्हयांसाठी पूर्वी देण्यात येणा-या ८० टक्केऐवजी यापुढे फक्त ५० टक्केच पंप देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आत्महत्यागस्त जिल्हयांवर अन्याय करणारा सदर निर्णय बदलण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-१२-२०१७)** :(१), (२) व (३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र. सौरप्र२०१४/प्र.क्र.२१९(भाग-३)/ऊर्जा-७,दि. १४/६/२०१७ नूसार प्रथमत: ७५४० नग सौर कृषि पंपांच्या उद्दिष्टात २४६० नग इतकी वाढ झाल्याने एकूण १०,००० नग सौर कृषीपंप राज्यात आस्थापित करण्याचे उद्दिष्ट निश्चीत केले आहे. अतिरिक्त कृषि पंपांच्या संख्येतील झालेली वाढ, मिळालेला प्रतिसाद, इतर जिल्हयातील मागणी, व्यवहार्यता विचारात घेऊन सदर योजनेची विहित कालावधीत उद्दिष्टपूर्ती होण्याच्या दृष्टीने ६ आत्महत्याग्रस्त जिल्हयांमध्ये ५० टक्के इतके प्रमाण व योजनेत समाविष्ट जिल्हयांच्या संख्येत वाढ करण्यात येऊन त्यात ५० टक्के इतके प्रमाण असे उद्दिष्टात बदल करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत सहकारी संस्थांना दिलेले कर्ज बेकायदेशीरपणे माफ केल्याबाबत**

**(३७) ९०५६६ (०४-०९-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत सहकारी संस्थांना दिलेले साडेआठ कोटीचे कर्ज बेकायदेशीरपणे माफ केल्याप्रकरणी जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या तत्कालीन संचालक मंडळासह २८ जणांविरुध्द क्रांती चौक पोलीस ठाण्यात गुन्हयाची नोंद झाल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-११-२०१७) :** (१) होय.

सदर प्रकरणी २८ आरोपींविरुध्द क्रांतीचौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद शहर येथे गु.र.नं.५७१/२०१७ भा. दं. वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ४६३, ४६८, ४७१, १२०(ब) प्रमाणे दि.०८/०६/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(२) व (३) या प्रकरणी ५२ संस्थांचे कर्ज औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने माफ केलेले नसून ते आर.बी.आय., नाबार्ड, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ मधील नियम ४९ चे तरतुदीनुसार वसुलीचा हक्क कायम ठेवुन एकूण ८,५२,०१,८६२/- रुपये इतके कर्ज निर्लेखन करण्यात आले आहे. त्यामुळे बँकेमार्फत कर्ज निर्लेखनानंतर थकीत कर्ज वसुलीची कार्यवाही चालु आहे.

तपासात सदर रक्कमेचा अपहार झाल्याचे किंवा सभासद शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक झाली असल्याचे निष्पन्न झालेले नाही. त्यामुळे सदरील गुन्हयाचा क वर्ग फायनल अहवाल मा.न्यायालयात सादर करण्यात आलेला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये ध्वनी प्रदुषण मोजमाप करण्याची यंत्रणा उपलब्ध करण्याबाबत**

**(३८) ९०६०७ (२१-०८-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये ध्वनी प्रदुषणाचे मोजमाप करण्याकरीता यंत्रणाच उपलब्ध नसल्याने मा.न्यायालयाने जाहीर केलेल्या शांतता क्षेत्रासह सर्वच ठिकाणी ध्वनी प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उक्त प्रकरणी विविध शासकीय प्रक्रियेमुळे सदर यंत्रणा राबविण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर यंत्रणा तातडीने कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१७)** :(१) व (२) हे खरे नाही.
(३) ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियम, २००० व पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ ची प्रभावीपणे अमलबजावणी करण्याकरीता सर्व पोलीस कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशान्वये ध्वनी प्रदुषण नियमांची प्रभावी अमलबजावणी होण्याकरीता ठाणे आयुक्तालयाकरीता सह पोलीस आयुक्त,यांच्या अध्यक्षतेखाली ध्वनी प्रदुषण संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली असून पोलीस उप आयुक्त, व प्रादेशीक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ हे या समितीचे सदस्य आहेत.

कल्याण-डोंबिवली महानगरपालीका क्षेत्रात ध्वनी प्रदुषणासंदर्भात जानेवारी ते जूलै, २०१७ पर्यंत महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ अंतर्गत महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये ३३ (डब्ल्यू) १३१ व ३३ (एन) (आर) १३१ प्रमाणे ६४ लोकांवर कारवाई करण्यात आली आहे. ध्वनी प्रदुषण नियमान्वये जानेवारी ते जूलै, २०१७ पर्यंत दाखल झालेले २७ प्रस्ताव विभागीय सहाय्यक पोलीस आयूक्त यांच्याकडे सादर करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कराड (जि. सातारा) येथील लोकप्रतिनिधी यांच्या अंगरक्षकाला झालेल्या मारहाणीचे प्रकरण**

**(३९) ९०६८३ (०४-०९-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड (जि. सातारा) येथील लोकप्रतिनिधी यांच्या अंगरक्षकाला काही गुंडप्रवृत्तीच्या लोकांकडून झालेल्या मारहाण प्रकरणी क-हाड तालुका पोलीस ठाण्याचे निरिक्षक तथा तपास अधिकारी अण्णासाहेब मांजरे यांनी या घटनेची चौकशी करुन कारवाई करण्यास दुर्लक्ष व टाळाटाळ केल्यामुळे त्यांना निलंबित करण्याची घोषणा मा.गृहराज्यमंत्री यांनी सन २०१७ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घोषणेनुसार शासनाने सदर पोलीस अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) पोलिस अधिकारी श्री.अण्णासाहेब मांजरे हे गुन्हयाचे तपासी अंमलदार नसुन गुन्हयाचा तपास प्रथम पासून महिला पोलिस सहायक पोलिस निरीक्षक श्रीमती जौजाळ या करीत होत्या. पोलीस निरीक्षक मांजरे हे कराड तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी होते. त्यांची पाटण

पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आलेली असून, त्यांना देय वार्षिक वेतनवाढ ३ वर्षे कालावधीसाठी स्थगित का करण्यात येऊ नये अशी कारणे दाखवा नोटीस विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांनी बजावलेली आहे. तसेच सदर प्रकरणी पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशानुसार विशेष पोलीस महानिरीक्षक राज्य राखीव पोलीस बल, पुणे यांच्याकडे सदर प्रकरणाची फेरचौकशी सोपविण्यात आली असून पुढील चौकशी सुरु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील व्यवस्थापन कंत्राटदाराकडे कमी कामगार संख्या असल्यास त्यांना नोंदणी कणे बंधनकारक असल्याबाबत**

**(४०) ९०७८४ (०४-०९-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्यवस्थापन कंत्राटदाराकडे ५० पेक्षा कमी कामगार संख्या असल्यास त्यांना कंत्राटी कायद्यामधील तरतुदीप्रमाणे नोंदणी करणे बंधनकारक केले असल्याचे दिनांक १६ एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटी कायद्यात बदल केल्यामुळे कामगारांची संख्या वाढवल्याने अनेक संकटाना सामोरे जावे लागत असून हा कायदा कामगाराविरोधात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामगारविरोधी कायद्यासंदर्भात लक्ष घालून कामगारांवर होणारा अन्याय दूर करण्याबातची मागणी कायद्यातील विधितज्ज्ञ यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग ३ बाबत शासनाने उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-११-२०१७) :**(१) महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०५.०१.२०१७ नुसार कंत्राटी कामगार सेवा (विनियम व उच्चाटन) अधिनियम, १९७० मध्ये सुधारणा करण्यात आली असुन ज्या उद्योगधंद्यामध्ये व कंत्राटदाराकडे ५० किंवा त्यापेक्षा जास्त कंत्राटी कामगार कामास असतील त्या आस्थापनांनी नोंदणी प्रमाणपत्र व कंत्राटदारांनी अनुज्ञाप्ती घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४१) ९०८४१ (०४-०९-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी)** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात सहाय्यक कामगार अधिकारी, शॉप ॲक्ट निरिक्षक, लिपीक, शिपाई अशी १४ पदे रिक्त असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इचलकरंजी हे औद्योगिक शहर असल्यामुळे कामगार विषयक लवाद आणि सतत औद्योगिक अशांतता निर्माण होत असल्यामुळे सदर कार्यालयातील रिक्त पदे भरणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-११-२०१७) :**(१) सहायक कामगार आयुक्त, इचलकरंजी या कार्यालयात मंजूर २१ पदांपैकी सहायक कामगार आयुक्त संवर्गातील १, दुकाने निरीक्षक श्रेणी-१ संवर्गातील-१ दुकाने निरीक्षक श्रेणी-२ संवर्गातील ५, लिपिक टंकलेखक, नाईक व शिपाई संवर्गातील प्रत्येकी १अशी वेगवेगळ्या संवर्गाची एकुण १० पदे रिक्त आहेत.
(२), (३) व (४) कामगार आयुक्त आस्थापनेवरील सहायक कामगार आयुक्त संवर्गातील पदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यावेळी सदरचे पद भरण्यात येईल.तद्वतच सदर कार्यालयातील दुकाने निरीक्षक संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही कामगार आयुक्त यांचे स्तरावर व उर्वरित गट 'क' मधील रिक्त पदे भरण्यासंदर्भात अपर कामगार आयुक्त, पुणे यांचे स्तरावर सुरू आहे.

---

### मौजे खांडोत्री (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) गावातील पाणीटंचाईबाबत

**(४२) ९१२९५ (२१-०८-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे खांडोत्री (ता. चिपळूण,जि.रत्नागिरी ) या गावामध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण होत असून उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्यासाठी वणवण करावी लागते, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर गावातील पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-१२-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) मौजे खांडोत्री (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावाला पाणी पुरवठा सुरु असलेली योजना खूप जुनी असल्याने सदर योजनेतील पाईपलाईन नादुरुस्त झाल्याने वारंवार पाण्याची गळती होते. यासाठी १४ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या निधीतून पाईपलाईन दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कृती आराखडा सन २०१८-१९ मध्ये सदर नळ पाणी पुरवठा योजनेचा समावेश करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्ह्यातील भूगाव व इंझापूर येथील कारखान्यामधील कामगारांच्या सुरक्षेबाबत**

**(४३) ९१४८० (०४-०९-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील भूगाव व इंझापूर येथील उत्तम गाल्वा मेटॅलिक लि., उत्तम व्हॅल्यू स्टिल लि. आणि इंद्रजित पॉवर प्रा.लि. या कारखान्यामध्ये कामगारांच्या सुरक्षेबाबत कोणतीही उपायोजना नसल्यामूळे या तीनही कारखान्यात वांरवार अपघात होत असून यात एका कामगाराचा मृत्यू तर वीस कामगार गंभीर जखमी झाले असल्याची गंभीर माहिती दिनांक ५ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्तबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार एकाच मालकाच्या या कंपन्यामध्ये वारंवार अपघात होत असल्यामूळे याबाबत शासनाने सदर कंपन्याविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२०-११-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

उत्तम व्हॅल्यू स्टिल लि.भुगाव रोड, जि.वर्धा या कारखान्यात दि.२७/०६/२०१५ रोजी गंभीर अपघात होऊन त्यामध्ये दोन कामगारांना गंभीर दुखापत झालेली होती. तर त्याच कारखान्यात दि.०६/१२/२०१५ रोजी झालेल्या अपघातामध्ये एका कामगाराचा मृत्यू झालेला होता.

इतर दोन कारखान्यांमध्ये दि.५ जून २०१६ रोजी तसेच मागील दोन वर्षात गंभीर किंवा प्राणघातक अपघात झाले नाहीत.

(२) व (३) उपरोक्त नमूद दोन्ही अपघातांची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातर्फे करण्यात आली चौकशीत असे निर्दशनास आले की, वर नमूद तीनही कारखान्यांचे भोगवटदार एकच नसून वेगवेगळे आहेत. वरील पैकी उत्तम व्हॅल्यू स्टिल लि.भुगाव रोड, जि.वर्धा या कारखान्यात झालेल्या अपघाताबाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.-

| अ.क्र. | दिनांक | अपघात स्वरुप | अपघातातील नुकसान | कारखाना अधिनियमाच्या भंगा संदर्भात कारखान्या विरुध्द करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १ | २७/०६/२०१५ | कारखान्यातील आर्क फर्नेसच्या बॉटम लान्सीग होस पाईपचे फिटींगचे व टेस्टींगचे काम सुरु | सदर झोत कामगाराच्या पोटावर आदळला तसेच त्याच परिसरात उभ्या असलेल्या | सदर प्रकरणी होस पाईप सुस्थितीत न ठेवल्याबाबत कारखाने अधिनियम १९४८ अंतर्गत कलम |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | असतांना होस पाईप क्रिम्पींगच्या भागापासून फाटला व उच्चदाबाचा ऑक्सीजन वायूचा झोत आला. | इंजिनियरच्या उजव्या हाताच्या पंजास फाटलेला पाईप जोरात लागल्यामुळे उजव्या हाताची तर्जनी कापली गेली. त्यांना दवाखान्यात लगेच उपचाराकरीता भरती करण्यात आले. एका कामगारास शारिरीक अंपगत्व आलेले नाही व दुस-या कामगाराची तर्जन कापली गेली असून त्याला नुकसान भरपाई देण्यात आली आहे. दोन्ही कामगार कामावर रुजू झालेले आहेत. | ७A(२)(a) च्या भंगाबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. |
| २ | ०६/१२/२०१५ | सदर अपघातात कारखान्या तील इलेक्ट्रिक आर्क फर्नेस मधील मोल्टन मेटलचे सॅम्पल घेत असतांना फर्नेसच्या स्लॅग डोअरमधून मोल्टन मेटल उडाले. | सदर मेटल कामगाराच्या अंगावर उडाल्यामुळे कामगारास भाजण्याच्या जखमा होऊन उपचारादरम्यान त्याचा हॉस्पीटलमध्ये मृत्यू झाला. | सदर अपघातप्रकरणी मोल्टन मेटलजवळ काम करीत असतांना कामगारास फायर प्रुफ अ‍ॅप्रॉन न पुरविल्यामुळे कारखाने अधिनियम १९४८ चे अंतर्गत कलम ७A(२)(b) चा भंगाबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. |

यापुढे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य या संचालनालयातर्फे कारखान्यात झालेल्या गंभीर तसेच प्राणघातक अपघातांबाबत वेळोवेळी भेटी देऊन चौकशी करण्यात आलेली आहे. तसेच अपघात होऊ नये यासाठी चौकशीच्या वेळी सुरक्षात्मक उपाययोजना सुचविलेल्या आहेत. उदा. जसे धोक्याच्या ठिकाणी काम करण्यासाठी कामगारांना प्रशिक्षीत करणे, धोक्याच्या ठिकाणी एसओपी तयार करणे, धोकादायक कामाच्या ठिकाणी आवश्यक ती सुरक्षा साधने कामगारांना देणे, धोकादायक कामाच्या ठिकाणी कारखान्यातील सक्षम/जबाबदार व्यक्तीची निगराणी ठेवणे व अपघात होवू नये यासाठी उपाययोजना करणे इ.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील अप्पर कामगार आयुक्त कार्यालयाची इमारत मोडकळीस आल्याबाबत**

**(४४) ९१७२७ (०४-०९-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे अप्पर कामगार आयुक्त कार्यालय हे बंगला नंबर ५ भाम्बुर्डा शिवाजीनगर पुणे, मुंबई रस्ता, येथील सुमारे १५० ते १७५ वर्ष पूर्वीच्या मोडकळीस आलेल्या इमारतीत कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोडकळीस आलेल्या कार्यालयाच्या इमारतीत कर्मचारी व कामानिमित्त आलेल्या नागरिकांना व कामगारांना कार्यालयीन सोई सुविधाच्या अभावी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भूखंडावर नवीन अप्पर कामगार आयुक्त कार्यालय उभारण्यासाठी मा. कामगार मंत्री यांच्याकडे शिवाजीनगर, पुणे स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मोडकळीस आलेल्या अप्पर आयुक्त कार्यालय बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१८-११-२०१७) :**(१) अपर कामगार आयुक्त,पुणे कार्यालयाची इमारत जुनी आहे .मात्र ती मोडकळीस आल्याची बाब खरी नाही.

(२) हे खरे नाही.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधीचे पत्र प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) व (५) सदर कार्यालयाची इमारत पाडून नवीन इमारत उभारण्यासंदर्भात शक्यता पडताळणी करण्याबाबत तसेच संबधित प्राधिकरणाचे अभिप्राय घेऊन सविस्तर प्रस्ताव पाठविणेबाबत कामगार आयुक्त यांना कळविण्यात आले आहे. या संदर्भातीलप्रस्ताव प्राप्त झाल्यावर मा.मंत्री (कामगार) यांचे स्तरावर बैठकीचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे.

---

**सापे (ता.महाड, जि.रायगड) या गावामधील पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु करण्याबाबत**

**(४५) ९२१६६ (२१-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सापे (ता.महाड, जि.रायगड) या गावाचा समावेश पाणीपुरवठा योजनेच्या सन २०१५-१६ च्या वार्षिक कृती आराखडयात असूनही त्यास अदयापी मंजूरी देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त आराखडयास मंजूरी देऊन पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-१२-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाच्या दिनांक २९.०६.२०१५ च्या पत्रान्वये, "ज्या योजनांना दिनांक २९.०६.२०१५ पूर्वी कार्यादेश दिलेले आहेत, तसेच ज्या योजना प्रत्यक्ष प्रगतीपथावर आहेत अशाच योजनांवर निधी खर्च करण्यात यावा, ज्या योजनांना राज्यस्तरीय योजना समितीने मान्यता दिलेली आहे, परंतु सदर योजना नियोजन टप्पा / निविदा प्रक्रियेत आहेत अश्या योजनांबाबत पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये," अशा सूचना दिलेल्या असल्यामुळे सदर योजनेचे काम हाती घेण्यात आले नव्हते. तथापि, पाणी पुरवठा योजनेची आवश्यकता विचारात घेऊन सन २०१७-१८ च्या कृती आराखड्यामध्ये सापे गावाचा समावेश करण्यात आला असून त्यास राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीच्या बैठकीमध्ये मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुषंगाने कामे सुरु करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग, महाड यांना कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अपंगांना अ, ब, क व ड या सर्व प्रवर्गामध्ये पदोन्नती नाकारण्यात येत असल्याबाबत**

**(४६) ९२४१७ (१८-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा. सर्वोच्च न्यायालयाने अपंगांना पदोन्नती देताना अ,ब,क व ड या सर्व प्रवार्गामध्ये पदोन्नती देण्यात यावी असे स्पष्ट आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा. सर्वोच्च न्यायलयाचे स्पष्ट आदेश असतानाही राज्यात या संबंधीचे धोरण निश्चित केले नसल्याचे कारण सांगून अपंगांना अ व ब प्रवर्गात पदोन्नती नाकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, मा. सर्वोच्च न्यायलायच्या आदेशानंतर ही पदोन्नती नाकारणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१७)** :(१) व (२) मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल ॲप्लीकेशन क्रमांक ५२१/२००८ प्रकरणी दिनांक ३०/०६/२०१६ रोजी दिलेल्या निकालात अपंगांसाठी अपंग व्यक्ती (समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ अंतर्गत सुनिश्चित करण्यात आलेल्या सर्व गट अ व गट ब च्या पदांना ३ टक्के आरक्षणाचा लाभ पद भरतीची पध्दत विचारात न घेता देण्याचे आदेश दिलेले आहेत. राज्यात अपंग कर्मचा-यांना गट ड मधून गट क वर व गट क मधून गट क च्यापदावर पदोन्नतीसाठी आरक्षण केंद्र शासनाच्या आदेशानुसार दिनांक ४.३.२००२ अन्वये विहित करण्यात आलेले आहे.

अपंग व्यक्ती/कर्मचारी यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देणे ही बाब राज्य घटनेच्या समवर्ती सूचितील विषय असून त्याबाबत राज्य शासन व केंद्र शासन दोघांनाही कायदा/नियम करता येतात परंतु या विषयी केंद्र शासनाने कायदा पारित केल्यास सदर कायदा राज्याच्या

कायदयापेक्षा सरस ठरुन त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक असते. केंद्र शासनाने नुकताच दिव्यांग अधिनियम, २०१६ पारित केलेला असून त्यांच्या अंमलबजावणी करीता आवश्यक आदेश निर्गमित करण्याची प्रक्रिया केंद्र शासनामार्फत सुरु आहे.

दिव्यांग कर्मचा-यांना गट अ व ब च्या पदावर पदोन्नतीसाठी आरक्षण निश्चितीचा प्रस्ताव विहित कार्यपध्दती प्रमाणे निर्णय प्रक्रियेत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात नव्याने समाविष्ट झालेल्या उपनगरात सांडपाणी व्यवस्थापन प्रणाली नसल्याबाबत**

**(४७) ९२९१० (२३-०८-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर तालुक्यात (जि.नाशिक) दोन औद्योगिक वसाहती असून नव्याने झालेल्या उपनगरात सांडपाणी व्यवस्थापन प्रणाली नसल्याने उपनगरातील रहिवाश्यांना गंभीर आजारांना बळी पडावे लागत असल्याची बाब माहे जून, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील रहिवाश्यांच्या आरोग्याची समस्या निवारण्यासाठी सांडपाणी व्यवस्थापन प्रणाली, भुयारी गटार योजना व मलनिःसारण केंद्र लवकरात लवकर होणेकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०१७) :**(१) • सिन्नर शहरामध्ये सध्या सांडपाणी प्रक्रियेची कोणतीही कायमस्वरुपी व परिपूर्ण यंत्रणा उपलब्ध नाही.

• तथापि, सिन्नर नगरपरिषदेत नव्याने समाविष्ट झालेल्या वसाहती, उपनगरात काही ठिकाणी सांडपाणी वाहून नेण्यासाठी बंदिस्त पाईप गटारांचे बांधकाम झालेले आहे.

• सदर भागांत कोणतेही साथीचे आजार उद्भवूनये यासाठी दैनंदिन साफसफाई व स्वच्छता तसेच जंतुनाशक फवारणी व जनजागृतीची मोहिम सिन्नर नगरपरिषदेमार्फत राबविली जाते.

• त्यामुळे अनेक वर्षांपासून साथीचे आजार झाल्याचे अथवा रहिवाश्यांना गंभीर आजारांना बळी पडावे लागत असल्याची बाब निदर्शनास आलीनाही.

(२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेंतर्गत सिन्नर नगरपरिषदेला भुयारी गटार प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे.

(३) व (४) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या स्थायी आदेशानुसार प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर करणे आवश्यक आहे.

• त्यानुसार वाढीव हद्दीसह संपुर्ण शहरासाठी भुयारी गटार योजनेचा प्रस्ताव सक्षम प्राधिकारणास तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे मुख्याधिकारी, सिन्नर नगरपरिषद यांनी कळविले आहे.

---

**मराठवाडा विभागात पाणीटंचाई असल्याने खाजगी टँकर्सद्वारे पाणी पुरवठा केल्याबाबत**

**(४८) ९३५७७ (२१-०८-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागात पिण्याच्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी माहे एप्रिल व मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सुमारे पावणे सहाशे टँकर्सव्दारे पाणीपुरवठा करण्यात आल्याची बाब माहे जून २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये खाजगी टँकर्सद्वारे पाणी पुरवठा झाल्याचे प्रमाण अधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टंचाई निवारणासाठी जिल्हानिहाय खर्च करण्यात आलेल्या निधीचा तपशील व खाजगी टँकर्सव्दारे पाणी पुरवठयामागची शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-१२-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) मराठवाडा विभागात टंचाई निवरणार्थ घेण्यात आलेल्या विविध उपाययोजनांसाठी जिल्हानिहाय झालेला खर्च पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | जिल्हा | खर्च (रूपये लाखात) |
|---|---|---|
| १) | औरंगाबाद | २३४५.४२ |
| २) | जालना | ६६६.६५ |
| ३) | परभणी | १७५.४२ |
| ४) | हिंगोली | १०५.६३ |
| ५) | नांदेड | ७५०.७१ |
| ६) | बीड | १४०.७७ |
| ७) | लातूर | ३९.९८ |
| ८) | उस्मानाबाद | ६६८.०३ |
| एकूण | | ४८९२.६० |

पाणी टंचाई कालावधीत ज्या गावांना दरदिवशी दर माणसी २० लि. पेक्षा कमी पाणी पुरवठा होतो, अशा गावांना पाणी टंचाई निवारणार्थ शासन निकषानुसार योग्य ती उपाययोजना हाती घेण्यात येते. इतर कुठलीही टंचाई निवारण उपाययोजना राबविणे शक्य नसल्यास टँकर्स द्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. टँकरद्वारे पाणी पुरवठा करतांना प्राधान्याने शासकीय टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो. शासकीय टँकर उपलब्ध नसल्यास खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो.

---

**नाशिक शहरातील वाहतूक पोलीस लाच घेत असल्याबाबत**

**(४९) ९३८६९ (०४-०९-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील शरणपूर रोड, इंदिरानगर बोगस, म्हसरुळ, दिंडोरी, विल्होरी परिसर,पपया नर्सरी , रामबिहारी चौफुली इ. ठिकाणी वाहतूक पोलीस लाच घेत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन येथील वाहतूक पोलिसांचा गैरप्रकार रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.

यापकारची कोणतीही तक्रार पोलीस आयुक्त, नाशिक शहर कार्यालयास प्राप्त नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्यातील बेरोजगार तरुणांना नोकरीचे आमिष दाखवून त्यांची फसवणूक केली जात असल्याबाबत**

**(५०) ९४९६६ (१३-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बेरोजगार तरुणांना दुबई, कुवेत येथे नोकरीचे आमिष दाखवून त्यांची फसवणूक केली जात असल्याची बाब दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी ठाणे येथील गुन्हे अन्वेषण शाखेच्या वागळे युनिटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना माहिती दिली असून पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

सदर बाब दि.१९.०८.२०१७ रोजी निदर्शनास आली आहे.

(२) होय, सदर प्रकरणी मुंब्रा पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. ३१९/२०१७, भा.दं.वि.कलम ४२०,४६५,४६८,४७१,३४ अन्वये ३ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) सदर गुन्ह्यातील ३ अटक आरोपीकडुन एकुण १०१ पासपोर्ट,४९ कुवेतचे व १३ दुबईचे असे एकुण ६२ बनावट व्हिसा तसेच लॅपटाप, प्रिंटर, मोबाईल फोन, रबर स्टॅप, डेबीट कार्ड स्वॅपिंग मशिन व पासपोर्ट संदर्भात इतर कागदपत्रे असा एकुण ४८,५००/- रु. किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

उपरोक्त नमुद गुन्ह्यातील आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.